दर गुरुवारी

किंमत १२ रुपये

वर्ष १ अंक ७ २२ ते २८ मार्च २०१२

# आधुनिक किसान

प्रगत शेतीची पाऊलवाट



शेतकऱ्याने बनविले पोल्ट्रीसाठी इलेक्ट्रिक ब्रुडर



पंढरपूरला साकारला बेदाणा निर्मितीचा 'बीएसआर' ब्रॅण्ड



सुधारित पद्धतीने गव्हाची मळणी करण्याच्या टीप्स्



शेतकरी आत्महत्यांशी बीटी तंत्रज्ञानाचा संबंध नाही



## खतांची खडाखडी

ख - खते

खा - खाण्यासाठी जमिनीला मोजकीच हवीत

खि - खिरापतीसारखी वाटू नये

खी - खीतपत पडू देऊ नका

# विचारशेती



शेतीचा सारा खेळ पाण्यावर अवलंबून असल्याने शेतीसाठी नियमित व हमखास पाणीपुरवठा कसा होईल, याकडे पुरेसे लक्ष दिले गेले पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी झरे सापडतील तिथे विहिरी खोदाव्यात. स्वत:हून विहीर खोदणाऱ्यास बक्षीस द्यावे. डोंगरदऱ्यांमध्ये शक्य तितकी तळी खोदावीत म्हणजे विहिरी आटणार नाहीत आणि शेतकऱ्यांना ओलीत शेतीही करता येईल.

**- ज्योतिबा फुले**



कोरडवाहू शेती आणि शेतकरी यांच्या विकासातूनच देशाचा विकास होणार असल्याने जिरायती शेतीच्या विकासावर आपण लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

**- राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील**



भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. काही दशकांनंतर कदाचित ती स्थिर होईल; पण तोवर भारतातल्या प्रत्येक नागरिकासाठी चांगल्या दर्जाचा अन्नपुरवठा होणं हे आपल्यासमोरचं सगळ्यात मोठं आव्हान आहे. त्यातून कृषी उत्पादनासाठी जेवढी जमीन उपलब्ध आहे त्यात वाढ होणार नाहीये, हेही लक्षात घेणं गरजेचं आहे.

**- डॉ. बी. आर. बारवाले**

शेतकऱ्याला स्वत:च्या पायावर प्रामाणिकपणे उभे करायचे असेल तर शेतकरी स्वावलंबी कसा होईल, याचा विचार करून तशी व्यवस्था केली पाहिजे. शेतकऱ्याला जोवर आपण मुख्य प्रवाहात आणत नाही, तोपर्यंत देशाचा झालेला आर्थिक विकास तकलादू राहील.

**- भवरलाल जैन**





आजपर्यंत परंपरेने आम्ही मानले की, शेती ही काही शिकण्यासारखी गोष्ट नाही. दोन बैल घ्यायचे, गाडी-घोडा घ्यायचा आणि घरात जे बी-बियाणे असेल, ते जमिनीत नेवून टाकायचे. परमेश्वराने टाकले पावसाचे पाणी तर उगवले, नाही तर नशीब आपले असे समजून गप्प बसायचे, असा हा शेतीचा व्यवसाय आम्ही केला आहे. आम्ही मुळातच इतरांपेक्षा मागासलेले आहोत. जे राष्ट्र निव्वळ शेतीवर अवलंबून राहते ते मुळातच अडाणी राहते. मी सांस्कृतिकदृष्ट्या नाही म्हणत. मागासलेल्या शेतीचा देश हा अतिशय मागासलेला राहतो, हे स्वीकृत तत्त्व आहे, स्वीकृत सत्य आहे.

**- यशवंतराव चव्हाण**
**माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री**
**(१५ फेब्रुवारी १९६० रोजी परभणी येथील कृषी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या शिलान्यासप्रसंगी केलेल्या भाषणातून)**

आपल्या कुटुंबाचे व आश्रितांचे पोषण, शिक्षण व इतर योग्य सुख-सोयींची उपलब्धी, याकरिता आवश्यक एवढीच व स्वत:, आप्त व आश्रित यांच्या श्रमाने कसता येईल एवढीच जमीन बाळगतो व कसतो तोच खरा शेतकरी होय. त्याऐवजी केवळ जमिनीवर हक्क सांगणारे अगर धारण करणारे ते सर्व भांडवलदार व शेतकऱ्यांचे किमानपक्षी प्रतिस्पर्धी मानावेत.

**- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे**